महाराष्ट्र शासन

# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.

**शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.**

**Ph.No** : (0721) 2573027, 2572577 **Website**: www.jdroamt.org
**Email**: roamravati@dtemaharashtra.gov.in **Fax No:** (0721) 2577913

**अत्यंत महत्वाचे**

क्रमांक :- विकाअ/शिक्षण /गु.या./२०२२/ 553
दिनांक :- 28 FEB 2022

**प्रति,**

**प्राचार्य,**
सर्व शासकीय / अशासकीय अनुदानित / विद्यापिठ विभाग / खाजगी विनाअनुदानित
अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/वास्तुशास्त्र पदवी व पदव्युत्तर पदवी संस्था,
तसेच एम.बी.ए. / एम.सी.ए. पदव्युत्तर पदवी संस्था
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :-शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील संचालनालयांतर्गत असलेल्या व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमात प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रियेची माहिती सादर करणे, प्रवेशित विद्यार्थ्यांची प्रवेश पडताळणी व प्रवेश मान्यतेची प्रक्रिया करण्याबाबत.**

**संदर्भ :-** १.मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्रमांक :- २अ/एडीएम/२०२२/६२ दिनांक २१ फेब्रुवारी २०२२.
२.या कार्यालयाचे पत्र क्रमांक :- विकाअ/शिक्षण/ गु,या.२०२२/५१६ दि. २४ फेब्रुवारी २०२२.

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता प्रथम व थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/वास्तूशास्त्र पदवी, पदव्युत्तर पदवी व एम.बी.ए. / एम.सी.ए. अभ्यासक्रमाच्या संस्थांनी ऑनलाईन गुणवत्ता यादी तपासणीचे दृष्टीने या कार्यालयाचे संदर्भ २ चे पत्रासोबत जोडलेल्या फ्लो चार्ट व युजर मॅन्युअल मध्ये दिलेल्या निर्देशाप्रमाणे **दिनांक २५/२/२०२२** पर्यंत आपल्यास्तरावरुन कार्यवाही करण्यात येऊन सदर पत्रामध्ये नमुद कागदपत्रे व आपल्या लॉगिनमधुन गुणवत्ता यादी या कार्यालयास ऑनलाईन सादर करण्यास कळविलेले आहे. तथापी ब-याचश्या संस्थांनी सदर गुणवत्ता यादी व आवश्यक कागदपत्रे या कार्यालयास सादर केलेली नाही. **याबाबत आपणास कळविण्यात येते की, संस्थेच्या इन्स्टिटयुट लॉगिनमधून प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांची प्रोसेसिंग शुल्क अदा करण्यात यावेत व इन्स्टिटयुट लॉगिन मधुनच प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांचे Choice Code तपासून घेऊन त्वरीत Lock करण्यात यावे. त्याशिवाय गुणवत्ता यादी पडताळणी करणे शक्य होणार नाही, याची नोंद घ्यावी.**

तेव्हा आपणास कळविण्यात येते की, सदरची कार्यवाही **दिनांक १/३/२०२२** पर्यंत करावी. त्याशिवाय ऑनलाईन गुणवत्ता यादीस मान्यता देता येणार नाही, यामध्ये आपल्या स्तरावरुन दिरंगाई झाल्यास होणा-या नुकसानीस आपण स्वत: जबाबदार राहाल, याची नोंद घ्यावी.

प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

**प्रत :- प्रोग्रामर,** तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.